राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मूल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सूचविण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: जिमस ०९१७/प्र.क्र. २०८/२-स,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. जिमस ०९१७/प्र.क्र. २०८/२-स, दि.३ नोव्हेंबर, २०१७

<u>प्रस्तावना : -</u>

राज्यातील शेतक-यांना त्रिस्तरीय सहकारी पत संरचनेमार्फत तसेच व्यापारी बँकांमार्फत पीक कर्ज पुरवठा करण्यात येतो. प्रत्येक वर्षी पीक कर्ज घेणा-या शेतक-यांपैकी सुमारे ६०% शेतकरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर अवलंबून आहेत.

राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी सुमारे१४ बँका आर्थिकदृष्टया कमकुवत आहेत. या बँकांकडे पीक कर्ज वाटपासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे अशा जिल्हयातील छोटे शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. तसेच काही जिल्हयातील अनेक विविध कार्यकारी सहकारी संस्था सातत्याने तोटयात आहेत. या संस्था त्यांच्या भागधारक सभासदांना लाभांश देण्यात असमर्थ ठरल्या आहेत. अशा संस्थांनी पीक कर्ज पुरवठयाबरोबरच अन्य व्यवसाय सुरु करणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मूल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सूचविण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्याची बाब तसेच “वाचा” येथील क्रमांक १ चा शासन निर्णय रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

“वाचा” येथील क्रमांक १ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे. तसेच राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मूल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सूचविण्यासाठी खालीलप्रमाणे तज्ञ समिती गठीत करण्यात येत आहे.

१. श्री.यशवंत थोरात, माजी चेअरमन, नाबार्ड	-	अध्यक्ष
२. डॉ. विजय झाडे, सहकार आयुक्त व निबंधक, पुणे	-	सदस्य
३. श्री.राजेंद्र एन कुलकर्णी, चीफ जनरल मॅनेजर, नाबार्ड, पुणे	-	सदस्य
४. श्री.विद्याधर अनासकर, सदस्य, प्रशासकीय मंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई	-	सदस्य

५. श्री.प्रतापराव चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा
मध्यवर्ती सहकारी बँक - सदस्य

६. श्री.दिनेश ओऊळकर, सेवानिवृत्त पणन संचालक, पुणे - सदस्य

७. श्री.डी.ए. चौगुले, सनदी लेखापाल तथा सेवानिवृत्त सहनिबंधक,
सहकारी संस्था (लेखा परिक्षण) - सदस्य

८. अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, मुख्यालय, पुणे - सदस्य सचिव

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :-

१) राज्यातील कमकुवत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणीत येण्याच्या कारणांचा अभ्यास करुन या बँकांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपाययोजना सूचविणे
२) राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना सूचविणे
३) राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचना सक्षम करण्यासाठी नाबार्डच्या धोरणात आवश्यक त्या सुधारणा सूचविणे
४) समितीस आवश्यक वाटतील अशा अन्य उपाययोजना सूचविणे

सदर समितीने आपला अहवाल तीन महिन्यात शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०६१२३४१७४८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2017.11.06 12:38:17 +05'30'

(रमेश शिंगटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) श्री.यशवंत थोरात, माजी चेअरमन, नाबार्ड
३) डॉ. विजय झाडे, सहकार आयुक्त व निबंधक, पुणे
४) श्री.राजेंद्र एन कुलकर्णी, चीफ जनरल मॅनेजर, नाबार्ड, पुणे
५) श्री.विद्याधर अनासकर, सदस्य, प्रशासकीय मंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई
६) श्री.प्रतापराव चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
७) श्री.दिनेश ओऊळकर, सेवानिवृत्त पणन संचालक, पुणे

८) श्री.डी.ए. चौगुले, सनदी लेखापाल तथा सेवानिवृत्त सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखा परिक्षण)

९) अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, मुख्यालय, पुणे

१०) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई (३ प्रती)

११) महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर (३ प्रती)

१२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१६) निवड नस्ती.